# ‘क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले’

‘क्रांतिज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले’ ह्या नावाचे डॉ. मा. गो. माळी ह्यांचे, नुकतेच प्रसिद्ध झालेले, पुस्तक पाहिले व वाचले. ज्योतिबा फुले ह्यांच्या कार्याची माहिती अगदी शाळेत असल्यापासून झाली होती. आपल्या समाजाच्या जडणघडणीचा अगदी धागा न धागा माहिती असल्यानेच ज्योतिबा फुले ह्यांनी स्त्रियांचे शिक्षण व दलितांचे शिक्षण ह्यांना फार महत्वाचे मानले. इतकेच नाही तर मेकॉलेच्या शिक्षणविषयक सिद्धांतातील त्रुटी त्या काळातच जोतिबा फुले ह्यांनी जाणल्या होत्या. शिकलेले मूठभर सर्व खालच्या वर्गांना न्यायबुद्धीने शिक्षण देतील ह्यावर त्यांनी त्या काळात दाखविलेला अविश्वास फार महत्वाचा आहे. सावित्रीबाईंचे नाव फक्त जोतिरावांच्या पत्नी एवढ्याच संदर्भात माहिती होते. पुस्तक वाचताना सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्वावर, कार्यावर आणि त्या काळावर विविध परिणामांतून प्रकाश पडत गेला. एक सलग चित्र उलगडत गेले. ह्या पुस्तकातली पुनरुक्ती बाजूला सारूनही सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्वातील मूळ ताकद जाणवली. हे पुस्तक वाचले गेले पाहिजे. ‘सावित्रीबाईच्या’ निमित्ताने स्त्रियांच्या विविध गटात चर्चा झाल्या पाहिजेत असे हे पुस्तक वाचून फार वाटू लागले.

गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्रात स्त्रीमुक्तीविषयक विचार अधिक जोमाने मांडले जात आहेत. पाश्चात्य देशांमधील स्त्रीमुक्तीविषयक चळवळीचा संदर्भ येथे मांडल्या जाणाऱ्या विचारधारेत आज अपरिहार्यपणे दिसतो. पण पाश्चात्य देशांमधल्या स्त्रियांच्या प्रश्नांचे स्वरूप भारतातील स्त्रियांच्या प्रश्नांपेक्षा मूलतः भिन्न आहे. महाराष्ट्रापुरता विचार करायचा झाला तर विकासाच्या एका टप्प्यावर हा प्रांत आहे. विविध जातीय व आर्थिक स्तरात विभागल्या गेलेल्या महाराष्ट्रातील समाजजीवनाचे सर्व प्रश्न ‘स्त्रीजीवना’-शीही भिडलेले दिसतात. उच्चशिक्षित उच्चवर्गीय स्त्रियांच्या समस्या आणि शेतमजूर दलित स्त्रीच्या आजच्या समस्या ह्यात ‘स्त्री’पणाचे एक नाते आहे असे मानले तरी ह्या दोहोंमध्ये अनेक दऱ्या आहेत हेही मान्यच करावे लागेल. एकाकी, आत्मकेंद्रीत स्वायत्त माणूस होण्यापाशी स्त्री मुक्तीचा विचार जाणे हे समाजपरिवर्तनाच्या गतीला मारक ठरेल. ह्यासाठीच स्त्रीमुक्तीचे आजचे आंदोलन व गेल्या शतकात ‘सुधारणावादी’ भूमिकेतून झालेले प्रयत्न ह्यातील नाते फार महत्वाचे आहे. ह्या दृष्टीने सावित्रीबाई फुले ह्यांचे चरित्र फार महत्वाचे आहे. प्रबोधनाच्या विचाराने झपाटलेल्या नवऱ्याबरोबर संसार करताना सावित्रीबाई पारंपारिक बंधनांना तोडून पुढे कशा गेल्या हे हे ह्या पुस्तकातून शोधता येते. पुस्तकात सावित्रीबाईंनी स्वतः लिहिलेल्या कविता, पत्रे आहेत. सावित्रीबाईंच्या आठवणी आहेत. अगदी नीतिमत्तेच्या पारंपारिक कल्पनांना छेद देऊन त्यांनी काही ठोस पावले कशी टाकली ह्याचे चित्रणही आहे. मुळात शंभर पानी पुस्तकात सावित्रीबाईंच्याबद्दल पुन्हा पुन्हा स्तुतीपर असा लिहिलेला मजकूर भरपूर आहे. पुस्तकलेखनाचे स्वरूप काहीसे ‘भाविक, ‘दैवीकरणात्मक’ असे आहे. पण हे दोष स्वीकारूनही पुस्तकातील मूळचा मजकूर अत्यंत मोलाचा आहे.

माणसा-माणसात सामाजिक समता हवी असे प्रतिपादन करताना स्त्रिया व पुरुष यांच्यातही समानता हवी यासाठी महात्मा फुले आयुष्यभर झगडले. हा झगडा त्यांनी स्वतःच्या घरातही दिला. मुलींसाठी शाळा काढायची तर समर्थ शिक्षिका हवी. ह्या प्रश्नाला उत्तर जोतिबांनी आपल्या पत्नीलाच शिकवून शोधले. सावित्रीबाईंनी केवळ पतिनिष्ठा म्हणून हे व्रत घेतले असे वाटत नाही. सावित्रीबाईंची पत्रे ह्या संदर्भात बोलकी वाटतात. माहेरी गेल्यावर तेथून लिहिलेली ही पत्रे आहेत. भावाबरोबर झालेल्या बोलण्याचे वर्णन मोजक्या धारदार शब्दांत सावित्रीबाईंनी लिहिले आहे. भाऊ प्रेमळ पण कोत्या बुद्धीचा आहे, एवढेच लिहून सावित्रीबाई अश्रू गाळीत बसल्या असे दिसत नाही.

त्यांनी भावाच्या मताचे खंडनही केलेले दिसते. ह्या पत्रात दिसणारे सावित्रीबाईंचे रूप फार तेजस्वी आत्मनिर्भर असे वाटते. स्त्रीमुक्तीच्या लढ्याचा अंतिम प्रवाह हा सर्वांगीण मानव–मुक्तीशी जोडावा लागेल. ह्याचे प्रत्यंतर ज्योतिबा–सावित्रीबाई जोडीत दिसते. स्त्री विरुद्ध पुरूष असा पवित्रा घेऊन प्रत्येक पुरुषाला पुरुषी परंपरेचा वाहक मानून एकाकीपणे हा लढा लढविणे हिताचे होणार नाही. कारण मग आज जागं आलेल्या सुशिक्षित स्त्रियांची मनेही ह्याच पुरुषप्रधान संस्कारांमधून घडली आहेत व म्हणूनच केवळ त्या प्रतिक्रियात्मक विचार करीत आहेत असेही कोणी म्हणल्यास वावगे होणार नाही.

विचार आणि कृती ह्यातील अद्वैत हा आणखी एक विशेष सावित्रीबाईंच्या चरित्रात आढळतो. काशीबाई ह्या तरूण विधवा ब्राह्मणबाईच्या पोटी अनौरस जन्मलेल्या मुलाला सावित्राबाईंनी दत्तक घेतले. स्वतःला मूल झाले नाही तेव्हा हसतमुखाने दुसरे लग्न लग्न करायची परवानगी ज्योतिबांना सावित्रीबाईंनी दिली त्यावेळी किंवा जोतिबांना साथ देण्यासाठी घरातली एकही चीजवस्तू न घेता घराबाहेर पडताना सावित्रीबाई आपल्या अंगभूत तेजाने चमकताना दिसतात. विधवा पुर्नविवाह, बालहत्या–प्रतिबंधक गृह, स्त्रियांसाठी शाळा ह्या सर्व कार्यक्रमात सावित्रीबाई स्वतः कृतिशील राहिल्या. विचारप्रसार आणि स्वतःचे काम ह्यातच सारे आयुष्य त्यांनी झोकून दिले. १८९७ सालच्या महाराष्ट्राभर पसरलेल्या प्लेगच्या साथीत रोग्यांवर उपचार करताना, त्यांची सेवा करताना सावित्रीबाईंना मृत्यू आला.

सावित्रीबाईंच्या काव्याचा उल्लेख न करता हा पुस्तक–परिचयाचा लेख पूर्ण होणार नाही. ह्या कविता तथाकथितदृष्टया कलात्मक नाहीत. पण अती सुंदर आहेत. शिक्षणाबद्दल, शूद्राबद्दल, जोतिबांबद्दल कवितेतून सावित्रीबाई लिहितात–

'अडाणी जनाचा असे कर्णधार
तयांना असे देतसे सद्‌विचार
कृतीवीर होता तसा ज्ञानयोगी
स्त्रिया शूद्रांसाठी सदा दुःखभोगी'

जोतिबांना उद्देशून अभिमानाने लिहिलेल्या ह्या कवितेच्या ओळी सुंदर अन मार्गदर्शक आहेत.

जोतिबा–सावित्रीबाई दोघे मिळून पूर्ण मानवत्वाप्रत कसे गेले हे या ओळींतून चटकन समजते.

**विद्युत भागवत**

---

(पान १९ वरुन)

घेता येत असे. मुलींच्या शिक्षणाची मात्र काहीच सोय नव्हती. याचा अर्थ असा नव्हे की स्त्रिया शिक्षित वा साक्षर नव्हत्या. काही कुळातील स्त्रियांना लिहिता वाचता येत असे. पण ते सर्व धार्मिक शिक्षणापुरते मर्यादित होते. सर्व कुटुंबाच्या कक्षेतच असे. स्त्रियांसाठी आधुनिक शिक्षणाचा प्रारंभ १९ व्या शतकाच्या प्रारंभीस मिशनऱ्यांनी उघडलेल्या शाळांमुळे झाला. पण या शाळांमध्येही उच्चवर्गवर्णाच्या स्त्रिया अतिशय कमी प्रमाणात जात. स्त्रियांवर रूढींची धार्मिक बंधने होतीच. इंग्रज शासनाने १८५४ पर्यंत स्त्री–शिक्षणाची जबाबदारी स्वीकारलेली नव्हती. १८५४ मध्ये वुडसाहेबांचा शिक्षणविषयक खलिता आला व मुलींच्या शाळांना प्रारंभ होऊ लागला. १८५४ साली सबंध मुंबई इलाख्यात पुरुषांसाठी २८७५ शाळा होत्या. त्यात एक लाखाहून अधिक विद्यार्थी होते. उलट महिलांच्या शाळा फक्त ६५ होत्या त्यात फक्त ३५०० मुली होत्या. त्यापैकी बहुसंख्य युरोपियन, अँग्लो इंडियन, ख्रिस्ती, पारशी समाजातील होत्या. स्त्री–शिक्षण अत्यंत मागासलेले होते. एकूण शिक्षणाची प्रगती मंद होती. त्यामध्ये स्त्रीशिक्षणाची प्रगती तर अत्यंत मंद होती. १८४८ साली फुल्यांनी मुलींसाठी पहिली शाळा काढली. ही शाळा ब्राह्मण मुलींप्रमाणेच शूद्रातिशूद्र मुलींसाठी होती. त्यामुळे स्त्री–शिक्षण व जातिभेद-विरोध या दोन्ही कारणांमुळे फुल्यांना मोठा विरोध सहन करावा लागला. सावित्रीबाईनाही फुल्यांनी शिकवले व त्याही शाळेत शिक्षिका म्हणून जाऊ लागल्या. यालाही समाजाचा विरोध होताच. सावित्रीबाईवर दगड फेक, शेणफेक झाली. गुंडांनी दम देण्यापर्यंत सामाजिक विरोध व्यक्त झाला. स्त्रियांना शिक्षण दिले तर स्त्रिया पुरूषांच्या डोक्यावर चढून बसतील असा सनातन्यांचा समज असे–त्यामुळे स्त्रीशिक्षणाला मोठ्या प्रमाणावर विरोध झाला.

एकंदरीत १९व्या शतकात सामाजिक व धार्मिक रूढी परंपरा याखाली सर्वसामान्य स्त्रीचे जीवन भरडून निघत होते! परंतु याच शतकात स्त्रियांच्या सामाजिक सुधारणांसाठी वैचारिक व सामाजिक संघर्षाला सुरुवात झाली! स्त्रीजीवनातील अंधार दूर होण्यास प्रारंभ झाला.

**–लता भिसे (शिराळकर)**